# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date: 20 November 2024
## Time: 7.10 to 7.20 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक: २० नोव्हेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी राज्यातल्या २८८ मतदार संघात मतदानाला प्रारंभ.
- मतदार ओळखपत्रासह इतर १२ पुराव्यांपैकी कोणत्याही एका पुराव्याद्वारे ओळख पटवून मतदान करण्याचं आवाहन.
- नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी आज मतदान-जिल्ह्यातल्या सहा विधानसभा मतदार संघातल्या मतदारांवर एकाच केंद्रात दोन वेळा मतदानाची जबाबदारी.
- मनाई आदेश भंग प्रकरणी भाजप नेते विनोद तावडे यांच्याविरोधात गुन्हा दाखल.

आणि

- महिलांच्या आशियाई चषक अजिंक्यपद हॉकी स्पर्धेत जपानला हरवून भारतीय संघ अंतिम फेरीत दाखल-आज चीनसोबत लढत.

****

राज्यात २८८ विधानसभा मतदार संघांसोबत नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठीच्या मतदान प्रक्रियेला नुकताच प्रारंभ झाला आहे. राज्यात नऊ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदार असून; एक लाख ४२७ मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत. संध्याकाळी सहा वाजेपर्यंत मतदान करता येणार आहे.

मतदान केंद्रावर मतदारांची ओळख पटवण्यासाठी मतदार ओळखपत्रासह इतर १२ पुराव्यांपैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे. यामध्ये वाहन चालवण्याचा परवाना, पॅन कार्ड, आधार कार्ड, पासपोर्ट, मनरेगा जॉब कार्ड, बँक

किंवा टपाल खात्याचं छायाचित्र असलेलं पासबुक, आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी अंतर्गत मिळालेलं स्मार्ट कार्ड, विशिष्ट दिव्यांगत्व ओळखपत्र, आदींचा समावेश आहे.

सर्व मतदारांनी ओळख पटवून मतदान करण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. लोकशाहीच्या या उत्सवात सर्वांनी सहभाग घ्यावा, असं पंतप्रधानांनी सामाजिक माध्यमावरच्या संदेशात केलं आहे.

मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी राज्यातल्या मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान करावं असं आवाहन केलं आहे...

**सकाळी सात वाजेपासून संध्याकाळी सहा वाजेपर्यंत मतदान केंद्र आपल्यासाठी तयार राहतील. काही कारणामुळे दिवसभर आपण जाऊ शकला नसेल तरी सुध्दा सहा वाजता पुर्वी मतदान केंद्रावर आपण हजर रहावे. सहा वाजता हजर राहिलेल्या सर्वांचे मतदान होईपर्यंत मतदान केंद्र उघडे राहतील. आपले मतदान घेतल्या शिवाय मतदान केंद्राचे कामकाज पूर्ण होणार नाही. आपल्याला विनंती आहे, आज न विसरता नक्की मतदान करावे.**

****

निवडणुकीसाठी यंदा चार हजार १३६ उमेदवार रिंगणात आहेत. त्यात तीन हजार ७७१ पुरुष, ३६३ महिला आणि दोन तृतीयपंथी आहेत. पुणे जिल्ह्यात सर्वाधिक ३०३ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत, तर सर्वात कमी १७ उमेदवार सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहेत.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या नऊ विधानसभा मतदारसंघात १८३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत, जालना जिल्ह्यातल्या पाच मतदारसंघात १०९ उमेदवार, बीड जिल्ह्यातल्या सहा विधानसभा मतदारसंघात १३९ उमेदवार, परभणी जिल्ह्यातल्या चार मतदारसंघात ५८ उमेदवार, हिंगोली जिल्ह्यातल्या तीन मतदारसंघात ५३ उमेदवार, लातूर जिल्ह्यातल्या सहा मतदारसंघात १०६ उमेदवार, धाराशिव जिल्ह्यातल्या चार मतदारसंघात ६६ उमेदवार तर नांदेड जिल्ह्यातल्या नऊ मतदारसंघात १६५ उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत १९ उमेदवारांमधून मतदारांना आपला खासदार निवडावा लागणार आहे. या लोकसभा मतदारसंघातल्या नांदेड उत्तर, नांदेड दक्षिण, भोकर, नायगाव, देगलूर आणि मुखेड, या विधानसभा क्षेत्रांमधल्या मतदारांना, दोन वेळा मतदान करायचं आहे. लोकसभेसाठी पांढऱ्या रंगाची स्टिकर्स असलेलं मतदान यंत्र, तर विधानसभेसाठी गुलाबी रंगाचे स्टीकर्स असलेलं मतदान यंत्र आहे. मतदारांनी मतदान केंद्रावर आपली ओळख पटवून दिल्यानंतर प्रथम लोकसभेसाठी आणि त्यानंतर विधानसभेसाठी मतदान करायचं आहे.

****

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या आगामी साहित्य संमेलनाच्या नियोजित अध्यक्ष तारा भवाळकर यांनीही मतदारांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे….

**बाईट – साहित्य संमेलनाच्या नियोजित अध्यक्ष तारा भवाळकर**

****

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात ४२६ 'महिला नियंत्रित मतदान केंद्र' तयार करण्यात आले आहेत. या केंद्रांचं नियंत्रण महिला अधिकारी कर्मचारी करत आहेत.

****

मतदान प्रक्रियेसाठी सर्व मतदान केंद्रांवर मतदान पथकं कालच दाखल झाली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात तीन हजार २७३ मतदान केंद्रांवरची मतदान प्रक्रिया सांभाळण्यासाठी, १८ हजार १७८ अधिकारी आणि कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

****

जालना जिल्ह्यातल्या पाचही मतदार संघात मिळवून एकूण एक हजार ७७५ केंद्रांवर मतदान होत आहे.

बीड जिल्ह्यातल्या सहा मतदार संघातल्या दोन हजार ४१६ मतदान केंद्रांवर, ११ हजार ४६९ कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.

नांदेड जिल्ह्यात तीन हजार ८८ मतदान केंद्र आहेत. या सर्व केंद्रांवर काल सकाळी सात वाजेपासून मतदान पथक रवाना होण्यास प्रारंभ झाला होता.

धाराशिव जिल्ह्यातल्या चार विधानसभा मतदारसंघामध्ये एक हजार ५२३ मतदान केंद्रांवर, १४ लाख चार हजार मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

****

विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहिता काळात १५ ऑक्टोबरपासून कालपर्यंत सी–व्हिजिल ॲपवर राज्यभरातून नऊ हजार २९३ तक्रारी प्राप्त झाल्या, त्यापैकी नऊ हजार २६५ तक्रारी निकाली काढण्यात आल्याची माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. या कालावधीत एकूण ६७३ कोटी २२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

****

भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्याविरोधात पालघर जिल्ह्यात नालासोपारा इथल्या तुळींज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रचार संपल्यानंतर मतदार नसलेले राजकीय नेते तसंच कार्यकर्त्यांनी मतदार संघात न थांबण्याबाबतचा मनाई आदेश भंग केल्याप्रकरणी तावडे यांच्यासह महायुतीचे उमेदवार राजन नाईक आणि सुमारे अडीचशे कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

यासोबतच प्रचार शांतता कालावधीमध्ये पत्रकार परिषद घेणं तसंच हॉटेल खोल्यांच्या झडतीत रोकड सापडल्याप्रकरणी आणखी दोन गुन्हे पोलिसांनी दाखल केले आहेत.

दरम्यान, बहुजन विकास आघाडी पक्षाने मात्र तावडे यांच्यावर पैसे वाटपाचा आरोप केला आहे. तावडे यांच्यासह भाजपने हे आरोप फेटाळले असून, या प्रकरणी निवडणूक आयोगाकडून चौकशी व्हावी, अशी प्रतिक्रिया दिली आहे.

काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले तसंच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, यांनी तावडे यांच्यावर कारवाईची मागणी केली आहे.

दरम्यान, भाजप प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनी माजी आयपीएस अधिकारी रविंद्रनाथ पाटील यांच्या हवाल्याने काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि खासदार सुप्रिया सुळे यांच्यावर केलेले आरोप काँग्रेस पक्षाने फेटाळून लावले आहेत.

****

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना, हवामान बदल आणि त्याचे आरोग्यावर होणारे परिणाम, यासाठी जिल्हा आणि शहर पातळीवर कृती योजना विकसित करण्याचे निर्देश दिले आहेत. केंद्रीय आरोग्य सचिव पुण्यसलिला श्रीवास्तव यांनी, सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य

सचिव तसंच सल्लागारांना या संदर्भात पत्र पाठवलं आहे. प्रदुषणामुळे होणारे आजार आणि त्या अनुषंगाने आरोग्य प्रणाली अद्ययावत करण्यासाठीच्या शिफारसींचा या पत्रात समावेश आहे.

****

बिहारमध्ये राजगीर इथं सुरु असलेल्या महिलांच्या आशियाई चषक हॉकी अजिंक्यपद स्पर्धेचा अंतिम सामना आज भारत आणि चीन दरम्यान होणार आहे. संध्याकाळी पावणे पाच वाजता सामन्याला सुरुवात होईल. काल झालेल्या उपान्त्य सामन्यात भारताने जपानचा दोन – शून्य असा पराभव केला, तर चीनने मलेशियाचा तीन– एक असा पराभव केला.

****

परभणी जिल्ह्यातल्या चार विधानसभा मतदारसंघात मतदान प्रक्रिया दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसंच प्रलोभनांचा गैरवापर आणि संशयास्पद हालचालींवर करडी नजर ठेवण्यासाठी, पोलीस प्रशासन "ड्रोन पेट्रोलिंग" करत आहे. अनेक भागात, वस्तीत काही वेळा जाणं शक्य होत नाही, अशा ठिकाणी ड्रोन प्रभावी मध्यम ठरत असल्याचं पोलीस अधीक्षकांनी सांगितलं.

बीड जिल्ह्यात मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी एका हजार २०९ मतदान केंद्रावर थेट प्रेक्षपण होणार आहे.

जालना जिल्ह्यातल्या पाच विधानसभा मतदारसंघांमध्ये चार हजार पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. चार संवेदनशील मतदान केंद्रांसाठी सी ए पी एफ पथकाची नेमणूक करण्यात आली असून, वेब कास्टिंग आणि मायक्रो ऑब्झर्व्हर्सद्वारे देखरेख केली जात आहे.

****

५५ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव–इफ्फीला आजपासून गोव्यात सुरुवात होत आहे. या महोत्सवात ८१ देशांमधले एकूण १८० चित्रपट प्रदर्शित केले जातील. येत्या २८ नोव्हेंबरपर्यंत हा महोत्सव चालणार आहे.

****

माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची १०७ वी जयंती आणि राष्ट्रीय एकात्मता दिवस काल सर्वत्र साजरा झाला. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राजभवन इथं गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. तसंच राजभवनातल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ दिली.

बीड इथं जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं.

****